**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयछत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय**
**जाहिरात**

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या आस्थापनेवर **"औषध निर्माण अधिकारी"** या संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर १७९ दिवसांच्या कालावधीसाठी एकत्रीत मानधानावर पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी सर्व कागदपत्रे मुलाखतीचे वेळी दोन प्रतीमध्ये सादर करावीत. कागदपत्रे सादर न करणारे उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरतील. शैक्षणिक अर्हता व पूर्ण अनुभवाची पूर्तता करणारेच उमेदवार मुलाखतीस पात्र असतील. मुलाखतीची वेळ व दिनांक हे www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

| पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | वेतन | वय |
|---|---|---|---|---|
| **औषध निर्माण अधिकारी**<br>**पदांचे आरक्षण**<br>१) अनू.जाती - ०२<br>(महिला - १ व सर्वसाधारण - १)<br>२) अनु.जमाती - ०१<br>३) विजा/भज अ - ०१<br>४) विजा/भज ब - ०१<br>**एकुण - ०५ पदे** | ०५ | मान्यता प्राप्त संस्थेतील D.Pharma/B.Pharm Course अधिक शासकीय निमशासकीय अथवा नामांकित रुग्णालयातील (१०० + खाटा) अनुभवास प्राधान्य | १५,०००/- दरमहा एकत्रीत मानधनावर | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्रक्र ४०४/कार्या.१२ दि.२६/०४/२०१६ अनुसार खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष, मागसवर्गीयासाठी ४३ वर्ष |

**महत्त्वाची सुचना :-**

१) पदभरतीबाबत विस्तृत अर्जाच्या लिंकसाठी https://forms.gle/८WUxhnbAB५MHUCbq७ येथे क्लिक करावे
२) सदर अर्जाची लिंक ही दिनांक ०७/१०/२०२० ते दिनांक ११/१०/२०२० पर्यंत उपलब्ध राहील.
३) उमेदवाराचे स्वत:चे gmail account असणे आवश्यक आहे.
३) अर्ज योग्यरित्या भरुन झाल्यावर submit हे बटन क्लिक करावे. **उमेदवाराने एकच अर्ज सादर करावा. एकापेक्षा जास्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**
४) अर्जाची प्रत आपल्या gmail ID वर प्राप्त होईल. (google form या नावे)
५) सदर अर्ज प्रिंट करून मूलाखतीच्या दिवशी प्रिंट केलेल्या अर्जासह उपस्थित रहावे.

**टिप :-**

१) उमेदवाराने अर्ज भरताना शैक्षणिक अर्हतेमध्ये गुणांची टक्केवारी, अनुभवाचा कालावधी माहिती बिनचूक टाकावी. अर्ज भरण्यास चूक झाल्यास अर्ज नाकरण्यात येईल.
२) उमेदवारांनी अर्जामध्ये जो अनुभव लिहीला आहे तो विचारात घेण्यात येईल. त्या व्यतिरिक्त अधिकचा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.
३) अनुभवाची गणना करताना शासकीय/निमशासकीय, स्थानिक संस्थेकडील कामकाजाच्या अनुभवासाठी प्रतिवर्षी ६ गुण असे धरण्यात येईल. प्रति तीन महिन्यांसाठी १.५ असे गुण धरण्यात येईल. तीन महिन्याच्या आतील अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

४) खाजगी संस्थेतील कामाचा अनुभव. १०० किंवा जास्त खाटांच्या रुग्णालयातील औषधालयातील कामाचा अनुभव विचारात घेतला जाईल.
५) 'अनुभवाची अट' याची पूर्तता करणारे उमेदवार मुलाखतीस नसल्यास जास्तीत जास्त दोन पदांवर नवोदित उमेदवारांची नेमणूक केली जाईल व परिक्षेतील गुण व प्रयत्न यानुसार गुणानुक्रम ठरेल. प्रत्येक वाढीव प्रयत्नांसाठी वजा पाच गुण दिले जातील.
६) मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरची यादीमध्ये स्वत:चे नाव तपासून मुलाखतीस उपस्थित रहावे. त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
७) उमेदवारांना मिळालेले गुण जर समान असतील तर वयाने ज्येष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
८) उमेदवाराने सादर केलेला अनुभवाचा दाखला अथवा इतर कोणताही दाखला बोगस आढळुन आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल व त्याची जबाबदारी संबधित उमेदवारावर राहील.
९) भरती प्रक्रियेचा तपशिल ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी वैयक्तिक स्वरुपात उमेदवारांनी पत्रव्यवहार करु नये अथवा संपर्क साधु नये.
१०) विहित मर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमुद करावा. संबधित विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करावे.
११) आरक्षीत संवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास अन्य आरक्षीत संवर्गातून उमेदवाराची निवड करण्यात येईल.

**अटी व शर्ती**

१) जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत.याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.
२) प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांमधुन उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.नावे संकेतस्थळावर येतील.
३) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) दिनांक ०६/१०/२०२० पर्यत वैध असलेले, इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती मुलाखतीचे वेळी मुळ दाखल्यासह सादर करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.
४) उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
५) मुलाखतीचे दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.
६) स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.
७) उमेदवाराने शैक्षणिक पात्रता, अनुभव व मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल.
८) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली अथवा मुलाखतीस उपस्थित राहीला म्हणजे मुलाखतीस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
९) उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबधीची माहिती महानगरपालिकेस देणे

आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१०)(i) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दिनांक २७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(ii) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.अशा प्रकरणांत देखिल अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

११) सदर जाहिरातीनुसारची भरती स्थगित करणे किंवा रदद् करणे, अंशतः बदल करणे,प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्याचा अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

१४) उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

१५) एखाद्या अर्जदाराने त्यांची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाब आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१६) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल/शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल माहिती/अगर.

१७) अ) सुवाच्च अक्षरात भरलेला सोबतचा अर्ज.

ब) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.

क) मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराने उच्च माध्यमिक परीक्षा व त्यापुढील शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, फार्मसी कौन्सिलकडील वैध नोंदणीपत्र व वास्तव्याचा पुरावा या कागदपत्रांचा संच व या संचाची एक झेरॉक्स प्रत स्वसाक्षांकित सोबत आणावी.

ड) जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला.

१८) स्थानिक पोलिस स्टेशनमधून चारीत्र्य व वास्तव्य दाखला निवड झाल्यावर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.

१९ ) निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमुन्यात एक हमीपत्र नेमणूक पत्रानंतर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.

२०) पदाची मुदत जास्तीत जास्त १७९ दिवस असेल.

२१) नियुक्त होण्याच्या तारखेचा उल्लेख नेमणूक पत्रात असेल. त्या तारखेपासून १७९ दिवस मोजले जातील. ती नेमणूकीची अंतिम तारीख असेल.

२२) उशिराने हजर होणा-यांसाठी अंतिम तारखेत बदल केला जाणार नाही.

२३) हंगामी (अस्थायी ) भरती केलेल्या या पदांवर सरळसेवेने भरती करण्यात आल्यास सदरची हंगामी (अस्थायी) नेमणूक रदद् करण्यात येईल/होईल.

२४) हंगामी नेमणूकीच्या अनुभवामुळे सरळसेवा भरतीत प्राधान्य दिले जाणार नाही.

२५) १७९ दिवसानंतर/अंतिम तारखेनंतर नेमणूकीस मुदतवाढ दिली जाणार नाही. आवश्यकता भासल्यास हंगामी नेमणूकांची प्रक्रिया पुनश्च नव्याने राबविण्यात येईल. कार्यरत कर्मचारी त्यासाठी नव्याने अर्ज करु शकतील.

२६) गुणानुक्रमानुसार एकापेक्षा जास्त उमेदवार एकाच पात्रतेचे ठरल्यास खालील बाबीनुसार प्राधान्यक्रम

ठरवला जाईल.

a) वयाने मोठा असणा-यांस प्राधान्य.

b) B.Pharm. पदवीस D.Pharm. पेक्षा प्राधान्य.

c) फार्मसी विषयातील गुण

d) एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्यांचे पांच गुण वजा होतील.

२७) नेमणुक पत्र दिनांकापासा ून सात दिवसांत प्रत्यक्ष हजर होऊ न शकणा-या/न होणा-या उमेदवारांएै वजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नेमणूक केली जाईल.

२८) सामाजिक आरक्षणानुसार पदासाठी उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर रिक्त पदांवर जनरल मेरिट लिस्टनुसार नियुक्ती केली जाईल. परंतु अशा नियुक्त उमेदवारांस मुदतवाढ दिली जाणार नाही.

अधिष्ठाता
राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय